Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.12,Jan. 2013
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# ''पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाच्या प्रवृत्तींचा अभ्यास-१९९७-९८ ते २००७-०८''

**वंदना विठ्ठल पिंपळे , के. एच. शिंदे**

प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आकुर्डी, पुणे.
श्री सदगुरू गंगागीरमहाराज महाविद्यालय,कोपरगाव, अहमदनगर.

***सारांश***

लोकशाही शासन पद्धतीमध्ये अंतिम सत्ता ही लोकांच्या हातामध्ये केंद्रित झालेली असते. या शासनप्रणालीमध्ये विकेंद्रीकरणाला महत्त्व दिले जाते. विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था (Local-self Government) महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतात. म्हणूनच स्थानिक स्वराज्य संस्थेला लोकशाही व्यवस्थेचा मूलाधार मानले जाते. देशामध्ये जास्तीत जास्त लोककल्याण साधण्यासाठी समाजातील निम्नस्तरावर कार्य करणे अत्यंत महत्त्वाचे असते. स्थानिक स्वराज्य शासन समाजातील निम्नस्तरावर कार्य करणारी यंत्रणा असून, सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनाला त्यांचा स्पर्श होत असतो. म्हणूनच देशातील जनेतेचे जास्तीत जास्त कल्याण करण्यासाठी देशामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था असणे ही महत्त्वपूर्ण बाब समजली जाते.

## *प्रस्तावना*

भारताच्या आधुनिक इतिहासामध्ये लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेबाबत केलेले प्रयत्न व त्याने संमत केलेला १८८२ चा स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायदा (अर्ली) लक्षात घेता लॉर्ड रिपन यास खऱ्या अर्थाने 'स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक' (Father of Local Self Government) असे म्हणतात. परंतु त्याच्या अगोदर म्हणजे १६८७ मध्ये मद्रास शहरात नगरपालिका या संस्थेला काही कर आकारण्याचे अधिकारही देण्यात आले. १७६३ मध्ये चार्टर ॲक्ट मंजूर करून नगरपालिकेला कायदेशीर स्वरूप देण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्थानिक संस्थांची रचना, कार्य, अधिकार, कार्यपद्धती, उत्पन्न-खर्च (आय-व्यय) इत्यादी मध्ये परिवर्तन करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थेची व्याख्या (Meaning of Local Self Government) :

स्थानिक स्वराज्य संस्थेचा अर्थ स्पष्ट करून घेताना खालील व्याख्यांचा विचार करणे गरजेचे ठरते. त्यातील काही महत्त्वाच्या व्याख्या खालीलप्रमाणे :

१)''स्थानिक शासन ही प्रामुख्याने स्थानिक समूहाच्या कल्याणासाठी विविध सेवांचे संचालन करण्याची पद्धती होय.'' - आर. एम. जॅक्सन
२)''स्थानिक शासन म्हणजे स्थानिक लोकांनी त्यांच्याशी संबंधित असलेल्या विषयांचे व्यवस्थापन स्वतःच करणे होय.''- एल. गोल्डिंग
३)''स्थानिक शासन म्हणजे लोकशाहीचा कणा होय.''(Local Governement is bankage of Democracy.) - विल्यम रॉब्सन


वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की, स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाहीसाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी (स्थानिक लोकांसाठी) व सार्वजनिक कल्याणासाठी (समूहकल्याण) फार महत्वाच्या समजल्या जातात.

महाराष्ट्र राज्याच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (लोकशाही विकेंद्रीकरण) संदर्भात अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली १९६० मध्ये एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ मध्ये सादर केला. या समितीच्या अहवालानुसार १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम संमत करण्यात आला व १ मे १९६२ पासून पंचायत राज व्यवस्था स्वीकारण्यात आली.

### स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रकार :

स्थानिक स्वराज्य संस्थेचे दोन प्रकार पडतात. वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था या आपापल्या स्तरावर कार्य करीत असतात. ते पुढीलप्रमाणे आहेत-

## तक्ता क्र. १.१




वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थेचे दोन प्रकार पडतात.

१)ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था    २) शहरी वा नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद या संस्था कार्यरत असतात.
ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जिल्हा परिषद ही सर्वोच्च स्तरावर, तर ग्रामपंचायत ही गावपातळीवर (निम्न स्तरावर) कार्य करते. जिल्हा परिषद व ग्रामपंचायत या दोघांमध्ये 'दुवा' साधण्याचे काम पंचायत समिती करते. पंचायत समिती ही तालुका पातळीवर कार्यरत असते. ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्था परस्परांशी संबधित असतात.
नागरी भागामध्ये वरील पंचायत व्यवस्था अस्तित्वात नसते. त्या ठिकाणी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (Urban Local Self Government) कार्यरत असते. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत, कटक मंडळे व नगर क्षेत्र समिती, शहर सुधार प्रन्यास, निर्देशित क्षेत्र समिती, उद्योग नगर, पोर्ट ट्रस्ट या संस्था अस्तित्वात असतात. त्या स्वतंत्रपणे कार्य करतात.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महानगरपालिका ही सर्वोच्च पातळीवर असते.

**महानगरपालिका :**

आधुनिक काळामध्ये केवळ महाराष्ट्रामध्येच नव्हे; तर इतर राज्यांतसुद्धा नागरीकरणाचा वेग वाढत आहे. कारण मोठ्या शहरांच्या ठिकाणी विविध कारणांमुळे लोकांचा ओघ वाढत आहे. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात ४२.४०% नागरी लोकसंख्या आहे. नगरपालिका अस्तित्वात येण्यासाठी किमान लोकसंख्या ही १०,०००, तर महानगरपालिका अस्तित्वात येण्यासाठी किमान लोकसंख्या ३,००,००० आवश्यक असते. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणारी चार शहरे आहेत. या मोठ्या शहरांमधील दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिका ही सर्वोच्च नागरी स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये २२ महानगरपालिका असून, राज्यातील सर्वांत पहिली व सर्वांत मोठी महानगरपालिका ही मुंबई महानगरपालिका आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका देशातच नव्हे; तर आशिया खंडात श्रीमंत महानगरपालिका म्हणून ओळखली जाते. महानगरपालिका असलेला जिल्हा म्हणून ठाणे जिल्हा ओळखला जातो. ठाणे जिल्ह्यामध्ये सात महानगरपालिका अस्तित्वात आहेत.

महाराष्ट्र राज्यामध्ये महानगरपालिका निर्मितीसाठी त्या शहराची लोकसंख्या ही कमीत कमी ३ लाख असणे गरजेचे आहे. राज्यामध्ये महानगरपालिका दर्जा प्रदान करण्याचे अधिकार राज्य शासनाचे आहेत. परंतु केंद्रशासित प्रदेशामध्ये महानगरपालिका घोषित करणे हे केंद्र सरकारच्या अधिकारात येते.

महानगरपालिकेच्या दैनंदिन प्रशासकीय कारभार करण्यासाठी प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून महानगरपालिका आयुक्त असून, त्याची निवड यू.पी.एस.सी. द्वारे (संघ लोकसेवा आयोग) केली जाते. आयुक्त कायद्याच्या अधीन राहून विविध कायदेशीर निर्णयांची अंमलबजावणी करीत असतो. त्याच्या मदतीसाठी इतर विभागप्रमुख अधिकारी नियुक्त केले जातात. तसेच राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने आयुक्त दैनंदिन कामासाठी वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची भरती करतात.

महानगरपालिकेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालत असून, महानगरपालिकेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निर्वाचित सभासदाला नगरसेवक म्हणतात. सर्व नगरसेवकांमधून एकाची महापौर म्हणून निवड होते. त्यास शहराचा प्रथम नागरिक म्हणतात.

येथे विशेष अभ्यास म्हणून महाराष्ट्रातील २२ महानगरपालिकांपैकी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडली आहे.

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका :**

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखला जाणारे समृद्ध शहर पिंपरी-चिंचवड.
पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी आणि चिंचवड असे जुळे नाव देण्यात आले आहे. १९५४ साली पिंपरीत पेनिसिलिनचे उत्पादन करणारी केंद्र सरकारच्या अखत्यारीतील हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स (एच. ए.) ही फॅक्टरी सुरू झाली. पिंपरी-चिंचवड शहराला उद्योगनगरीचा दर्जा देण्यासाठीची मुहूर्तमेढ एचएने रोवली. १९६०-७० या दशकात कारखान्यांची संख्या बरीच वाढली. रस्टन, कूपर, टेल्को, बजाज, गरवारे असे नामांकित उद्योग शहरात आले. उद्योगांबरोबर कामगारांना रोजगार मिळाला. कामगारांची संख्या वाढल्याने त्यांच्या निवासासाठी येथील खेडेगावांमध्ये चाळी बांधल्या गेल्या. गावात लोकसंख्या वाढल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड देण्यासाठी ग्रामपंचायती कमी पडल्या. वाढती लोकसंख्या,

तसेच झपाट्याने वाढणाऱ्या कारखान्यांची संख्या लक्षात घेता ग्रामपंचायतींना वाढत्या लोकसंख्येला मूलभूत नागरी सुविधा पुरविणे, वेगवेगळे दाखले देणे, विविध प्रकारच्या परवानग्या देणे इ. अनेक बाबी करणे अवघड होऊ लागले. त्यातून पिंपरी, चिंचवड, आकुर्डी आणि भोसरी या चार ग्रामपंचायती विसर्जित करून नगरपालिका अस्तित्वात आली.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास खात्याकडील अधिसूचना क्रमांक पी.सी.सी. १०८२/२१० यू.डी. २०, दिनांक ५-१०-८२ अन्वये दिनांक ११.१०.८२ रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये अस्तित्वात आली. १९८०-८१ साली १.४९ लाख, १९९०-९१ च्या जनगणनेप्रमाणे ५.१९ लाख लोकसंख्या व २०००-०१ च्या जनगणनेप्रमाणे १०.०६ लाख लोकसंख्या येत महापालिका हद्दीत असून, ही अ दर्जाची महानगरपालिका आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रफळ१७१ चौ. कि. मी. असून सद्य:स्थितीतील लोकसंख्या १२ लाख आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रामुख्याने महानगरपालिका कार्यरत असते. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजा पार पाडण्यासाठी तसेच स्थानिक समस्या सोडविण्यासाठी या संस्थेला कटिबद्ध राहावे लागते. महानगरपालिकेला सामान्यत: अनिवार्य व ऐच्छिक या दोन प्रकारची कार्येकरावी लागतात. पार पाडण्यासाठी महानगरपालिकेची वित्तीय स्थिती विचारात घेणे आवश्यक असते. कारण प्रत्येक गोष्ट ही वित्तीय स्थितीशी संबंधित असते. कोणत्याही महानगरपालिकेचा विकास हा प्राप्त होणाऱ्या उत्पन्नावरच अवलंबून असतो. महानगरपालिकेकडे भरपूर पैसा असेल, तरच ती आपल्या क्षेत्रातील नागरिकांसाठी कल्याणकारी कार्येप्रभावीपणे करू शकते. त्यासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या मार्गांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

महानगरपालिका या शब्दामध्येच संबंधित शहरांमधील जनतेचे पालकत्व या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असल्याचा अर्थ अभिप्रेत असून, त्याकरिता महानगरपालिकेत नागरी सोईंच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर रकमेचा योग्य पद्धतीने विनियोग करण्याची जबाबदारी महानगरपालिकेस पार पाडावी लागते.
त्यासाठी महानगरपालिकेने उपलब्ध झालेल्या उत्पन्नातून केलेल्या खर्चाचाही अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाच्या प्रवृत्तींचा अभ्यास करताना प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१)महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाच्या मार्गांच्या प्रवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२)महानगरपालिकेच्या वित्तीय स्थितीचा अभ्यास करणे.
३)महानगरपालिका लोककल्याणासाठी राबवीत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेणे.
४)करदात्यांच्या कराविषयीच्या प्रतिक्रियांचा अभ्यास करणे.
५)महानगरपालिकेने उत्पन्न वाढविण्यासाठी कोणत्या उत्पन्न बाबींवर अधिक भर द्यावा यासाठी आवश्यक शिफारशी करणे.

**अभ्यासाची गृहीतके :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाच्या प्रवृत्तींचा अभ्यास करताना प्रमुख गृहीतके खालीलप्रमाणे आहेत-

१)महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नात जकातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा फार मोठा आहे.
२)महानगरपालिकेच्या भांडवली खर्चाच्या तुलनेत महसुली खर्च अधिक असून, महसुली खर्चात सतत वाढीची प्रवृत्ती आहे.
३)महानगरपालिकेमार्फत राबविल्या जात असलेल्या लोककल्याणकारी सेवांचा दिवसेंदिवस विस्तार घडून येत आहे.

**संशोधन पद्धती :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चाच्या प्रवृत्तींचा अभ्यास करण्यासाठी १९९७-९८ ते २००७-०८ हा अकरा वर्षांचा कालखंड निश्चित केलेला आहे.
तसेच प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती व आकडेवारी ही प्राथमिक व दुय्यम सामग्रीद्वारे गोळा केलेली आहे.

**प्राथमिक सामग्री :**

महानगरपालिकेच्ये करधारणेविषयी जाणून घेण्यासाठी विद्यमान नगरसेवकांकडून प्रश्नावली भरून घेतलेली आहे. १०५ नगरसेवकांपैकी ५० नगरसेवकांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे. प्रश्नावली भरण्यासाठी नगरसेवकांची निवड नमुना निवड पद्धतीतील नियमित अंकन प्रणालीनुसार करण्यात आली आहे.

तसेच २५० करदात्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित केली असून, करदात्यांची निवड सोईस्कर नमुना निवड पद्धतीने केली आहे. करासंबंधी महानगरपालिकेसंबंधित विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

**दुय्यम सामग्री :**

प्रस्तुत संशोधनात दुय्यम सामग्री संकलनात प्रबंध, पुस्तके पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका वार्षिक अंदाजपत्रक, महाराष्ट्र शासनाचे आर्थिक सर्वेक्षणाचे अहवाल, शासनाची परिपत्रके, इंटरनेट, विविध वृत्तपत्रांतील लेख, चर्चासत्रे, मासिके इत्यादी व्दारे माहिती संकलित केली आहे. साधने यांचा वापर करण्यात आलेला आहे.

उत्पन्न खर्च प्रवृत्तींचा अभ्यास कण्यासाठी सरासरी, शेकडेवारी प्रमाण, शेकडा वृद्धी दरातील वाढ-घट, टक्केवारी इ. गणितीय साधनांचा माहितीच्या विश्लेषणासाठी वापर करण्यात आला आहे.

**प्रकरणानुसार प्रबंधाची मांडणी :**

प्रस्तुत प्रबंधाची मांडणी एकूण सहा प्रकरणांमध्ये करण्यात आली आहे.
प्रकरण पहिले : प्रास्ताविक :

यामध्ये संशोधनाचे महत्त्व उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती व व्याप्ती इ. समावेश करण्यात आलेला आहे.

**प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा :**

या प्रकरणामध्ये संशोधनापूर्वी विविध संशोधकांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण तिसरे : पिंपरी-चिंचवड शहर व महानगरपालिकेचा अभ्यास :**

या प्रकरणामध्ये प्रकरणाची विभागणी दोन विभागामध्ये करण्यात आली आहे.
विभाग पहिला - यामध्ये पिंपरी-चिंचवड शहराचा इतिहास, लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्रफळ, सार्वजनिक सुविधा या बाबत विश्लेषण केले आहे.
विभाग दुसरा - यामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा पूर्वइतिहास, हद्द, कर्मचारी, तसेच राजकीय पार्श्वभूमी याबाबतचे विश्लेषण केले आहे.

**प्रकरण चौथे : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न प्रवृत्तींचा अभ्यास :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला करांपासून उत्पन्न, मालमत्तेपासून उत्पन्न, शासकीय अनुदान इ. बाबींपासून उत्पन्न मिळते. त्याचा अभ्यास केला आहे. उदा. मनपा करांपासून उत्पन्नामध्ये घरपट्टी, पाणीपट्टी, करमणूक कर, जाहिरात व आयात कर, विशेष साफसफाई कर इ. कर प्रवृत्तींचा सदर प्रकरणात अभ्यास केला आहे. तसेच सदर प्रकरणात १०५ वॉर्डांमधून २५० करदात्यांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण पाचवे : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या खर्च प्रवृत्तींचा अभ्यास :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा सामान्य प्रशासकीय खर्च, भांडवली खर्च, सार्वजनिक सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य व सोई, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण विभाग, क्रीडा विभाग, कायदा विभाग, परवाना विभाग इ. खर्च प्रवृत्तींतील बदलांचा सदर प्रकरणात अभ्यास करण्यात आला आहे. तसेच विद्यमान नगरसेवकांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी :**

याप्रकरणामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्च प्रवृत्तींचे ठळक निष्कर्ष व प्रमुख शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

**अभ्यासाची मर्यादा :**

सदर अभ्यास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला करासंबंधी धोरण आखताना, निर्णय घेताना निश्चित फायदेशीर ठरेल. प्रस्तुत संशोधनासाठी मागील ११ वर्षांचा कालावधी निवडला असून, प्रश्नावलीसाठी नगरसेवकांची निवड करीत असताना फक्त विद्यमान नगरसेवकांचीच निवड केली आहे. सदर संशोधन अभ्यासाची व्याप्ती खूप मोठी आहे. भारत व महाराष्ट्रात असणाऱ्या सर्व महानगरपालिका ही अभ्यासाची व्याप्ती असली, तरी केवळ महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिका घेऊन तिचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. म्हणून सदर संशोधन हे फक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेपुरतेच मर्यादित आहे.

**काही महत्त्वाचे निष्कर्ष :**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्पन्न प्रवृत्तींचा अभ्यास :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नामध्ये १९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये ८५०६७.१० लाख रुपये निव्वळ वाढ झाली. कारण १९९७-९८ मध्ये एकूण उत्पन्न हे १९२०४.६३ लाख रुपये होते, तर २००७-०८ या वर्षी १०४२७१.७४ लाख रुपये होते.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या एकूण उत्पन्नामध्ये १९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये ८५०६७.१० लाख रुपये निव्वळ वाढ झाली. कारण १९९७-९८ मध्ये एकूण उत्पन्न हे १९२०४.६३ लाख रुपये होते, तर २००७-०८ या वर्षी १०४२७१.७४ लाख रुपये होते.
सन १९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यासाच्या कालावधीमध्ये दोन वर्षांचा अपवाद सोडला, तर इतर वर्षी उत्पन्नामध्ये अगोदरच्या वर्षाच्या तुलनेत वाढ झालेली दिसून येते. (अपवाद वर्ष १९९८-९९ व २००३-०४ या वर्षामध्ये पूर्वीच्या उत्पन्नांच्या तुलनेत घट झालेली आहे.
अभ्यासाच्या कालखंडामध्ये (१९९७-९८ ते २००७-०८) एकूण उत्पन्नातील सरासरी वार्षिक वाढ ७७३१.३७ लाख रुपये असून, एकूण उत्पन्नवाढीचा सरासरी वार्षिक प्रतिशत दर हा १७.६२% आहे.
अभ्यासाच्या कालखंडामध्ये (१९९७-९८ ते २००७-०८) सर्वाधिक उत्पन्नवाढ ही सन २००६-०७ या वर्षी असून ती २५.७२% इतकी आहे. तसेच सर्वांत कमी वाढ २००१-०२ या वर्षी झालेली असून ती ४.४९% इतकी आहे.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला १९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये एकूण मुख्य पाच स्रोतांपासून उत्पन्न मिळाले. पैकी चार करेतर उत्पन्नामध्ये येतात. तरीसुद्धा या अभ्यासाच्या कालखंडामध्ये एकूण करमहसूल ३८३५५८.३९ लाख रुपये (८१.८३%) असून एकूण करेतर महसूल ७८४१०.६ लाख रुपये (१८.१७%) इतका आहे. शेवटी असा निष्कर्ष निघतो की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अभ्यासाच्या कालावधीमध्ये एकूण उत्पन्नामध्ये कर उत्पन्नाचे प्रमाण अधिक आहे.
अभ्यासाच्या एकूण अकरा वर्षांच्या कालखंडामध्ये एकूण उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचा शेकडा दर हा १९३.९० इतका आहे.
१९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यास कालावधीमध्ये एकूण कर उत्पन्नामध्ये २०००-०१ या वर्षीचा अपवाद वगळता सातत्याने वाढ होत गेलेली आहे. १९९७-९८ साली कर उत्पन्न ३८६६१८.०० लाख रुपये होते, तर २००७-०८ साली कर उत्पन्न ८१४३८.०० लाख रुपये इतके झाले. सरासरी वार्षिक प्रतिशत वाढ १७.७४ इतकी आहे.
१९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यास कालावधीमध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला करापासून मिळालेले उत्पन्न ३८७३५८.३९ लाख रुपये हे एकूण उत्पन्नाच्या (रु.४७३३२४.००) ८१.८३% इतके असून, ते इतर उत्पन्नाच्या स्रोतांपेक्षा जास्त आहे.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला अभ्यासाच्या कालावधीमध्ये मिळणाऱ्या उत्पन्नाच्या स्रोतांपैकी शासकीय अनुदान या स्रोतापासून मिळालेले उत्पन्न हे रु. ७२२६.३७ लाख म्हणजेच एकूण उत्पन्नाच्या १.५२% इतके आहे.
१९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यास कालावधीमध्ये एकूण करेतर उत्पन्नामध्ये तीन वर्षांचा अपवाद वगळता सातत्याने वाढ होत गेलेली दिसून येते. १९९७-९८ साली करेतर

उत्पन्न ३७३१.७२ लाख रुपये मिळाले असल्याचे आढळून आले.
१९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये मिळणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोतांपैकी
महानगरपालिकेला करेतर उत्पन्न स्त्रोतामधून मिळालेले उत्पन्न हे ८६७०५.३५ लाख रुपये मिळाले असून, त्याची वार्षिक सरासरी रु. ७८८२.३५ लाख असल्याचे आढळून आले.
१९९७-९८ ते २००७-०८ या काळामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी (रु. ४७३३२४.०१ लाख) करेतर उत्पन्न हे रु. ८६७०५.८६ लाख इतके होते.
याचाच अर्थ करेतर उत्पन्नाचा एकूण उत्पन्नामध्ये हिस्सा हा १८.३१% इतका आढळून आला.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला १९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यासाच्या कालावधीमध्ये जकातीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये एक वर्षाचा (२०००-०१) अपवाद वगळता वाढच होत गेलेली आहे. तसेच एकूण उत्पन्नामध्ये जकात कराचे सरासरी प्रमाण ७२.६२% आढळून आले.
१९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये जकात करापासून मिळालेल्या उत्पन्नामध्ये रु.६०२७३ लाख इतकी निव्वळ वाढ झाल्याचे आढळून आले. कारण १९९७-९८ मध्ये जकात करापासूनचे उत्पन्न रु.१३७३६ लाख होते, तर तेच अभ्यासाच्या शेवटच्या कालावधीमध्ये (२००७-०८) रु. ७४००८ लाख झाले.
१९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यासाच्या कालावधीमध्ये एकूण कर उत्पन्नामध्ये जकात कराचा वाटा सर्वाधिक म्हणजेच ९५.३% इतका आहे. याचाच अर्थ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला आर्थिक स्थिरता व स्वायतत्ता प्राप्त होण्यासाठी जकात कराचा फार मोठा हिस्सा आहे. परिणामी जकात कर महानगरपालिकेला फायदेशीर ठरत असून, दररोज रोख स्वरूपात उत्पन्न प्राप्त होत असल्यामुळे शहराच्या विविध विकासाच्या योजनांसाठी अनेक नवीन प्रकल्प आखण्यास मदत होत आहे.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला १९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यासाच्या कालावधीमध्ये घरपट्टीपासून मिळणाऱ्या करांपासून एक वर्षाचा अपवाद (१९९८-९९) वगळता मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये वृद्धी होत गेलेली आढळून येत आहे. १९९७-९८ मध्ये घरपट्टी उत्पन्न रु. १३४५.८ लाख होते, तर २००७-०८ मध्ये ते रु. ४८९३.१६ लाख इतके आढळून आले.
एकूण उत्पन्नामध्ये घरपट्टीचा वाटा हा ५.७३% इतका आहे. (एकूण उत्पन्न रु. ४७३३२४ लाख व एकूण घरपट्टी रु.२७१२१.७८ लाख) तसेच एकूण कर उत्पन्नामध्ये घरपट्टी उत्पन्नाचा वाटा ७% इतका आहे. (एकूण कर उत्पन्न रु. ३८७३५८.३३ लाख व घरपट्टी उत्पन्न रु. २७१२१.७८ लाख)
महानगरपालिकेला १९९७-९८ ते २००७-०८ या कालावधीमध्ये चार वर्षांचा अपवाद वगळता इतर वर्षी अगोदरच्या वर्षाच्या पाणीपट्टीपासून मिळालेल्या करामध्ये वृद्धी होत गेलेली आहे.
१९९७-९८ मध्ये पाणीपट्टी उत्पन्न रु. ३७५.६५ लाख इतके होते, तर ते २००७-०८ मध्ये २३९२.०६ लाख झाले. यावरून पाणीपट्टीमध्ये निव्वळ वाढ २०१६.४१ रु. इतकी झाली असून, शेकडा वाढ १८३.३१ इतकी झाल्याचे आढळून आले.
एकूण उत्पन्नामध्ये पाणीपट्टीचा वाटा हा १.७६% इतका आहे. (एकूण उत्पन्न रु. ४७३३२७ लाख व पाणीपट्टी उत्पन्न रु.८३६९.०३ लाख) तसेच एकूण कर उत्पन्नामध्ये पाणीपट्टी उत्पन्नाचा वाटा २.१६% इतका (एकूण कर उत्पन्न रु. ३८७३५८.३३ लाख व पाणीपट्टी कर उत्पन्न रु. ८३६९.०३ लाख) असल्याचे आढळून आले.
महानगरपालिकेला इतर करांपासून मिळालेले एकूण उत्पन्न हे रु. ४३५.६९ लाख असून, त्या उत्पन्नाची वार्षिक सरासरी ३९.६० रु. लाख इतकी येत आहे. उत्पन्न वाढीचा प्रतिवर्षी सरासरी दर हा शेकडा ३७.७१ इतका आढळून आला.
एकूण उत्पन्नामध्ये इतर कर उत्पन्नाचा हिस्सा हा ०.८८% इतका अल्प असून एकूण कर उत्पन्नामध्ये इतर कर उत्पन्नाचा हिस्सा हा ०.११% इतका असल्याचे दिसून येते.

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या खर्चाच्या प्रवृत्तींचा अभ्यास :**

१९९७-९८ ते २००७-०८ अभ्यासाच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेचा एकूण खर्च हा रु.३१,१३५.७३ लाख रुपयांवरून रु.१२७५४१.८३ लाख रुपयांवर गेला. या ११ वर्षांच्या कालखंडामध्ये एकूण खर्चामध्ये निव्वळ वाढ ही रु.९६४०६.१ लाख झाल्याचे दिसून येते.
एक वर्षाचा अपवाद (१९९८-९९) वगळता इतर सर्व वर्षी एकूण खर्चामध्ये अगोदरच्या वर्षीच्या खर्चापेक्षा वाढ झाल्याचे आढळून आले. याचाच अर्थ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या खर्च प्रवृत्तीमध्ये एक वर्षाचा अपवाद सोडता चढीची प्रवृत्ती दिसून येते.
१९९७-९८ ते २००७-०८ या अभ्यासाच्या काळामध्ये एकूण खर्चातील एकूण वाढ ही सरासरी रु. ८५१६.१९ लाख असल्याचे आढळून आले.
११ वर्षांच्या कालखंडामध्ये महानगरपालिकेचा एकूण खर्च वाढीचा वार्षिक वृद्धीदर सरासरी १४.५९% इतका आहे.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने अभ्यास कालखंडामध्ये सामान्य प्रशासकीय खर्च, सार्वजनिक सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य व सोयी, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण विभाग, संकीर्ण विभाग, अनामत परतावे अशा एकूण सात बाबींवर खर्च केला आहे.
सामान्य प्रशासकीय विभागावरील खर्च हा एकूण खर्चाच्या ६.५९% इतका आहे.
सार्वजनिक सुरक्षितता विभागावर होणारा खर्च हा १९९७-९८ साली रु. १५६१.९२ लाख होता तर २००७-०८ साली तो १०२७१.०७ लाख रुपये झालेला आहे. याचाच अर्थ एकूण वाढ रु.८६१९.१५ लाख असल्याचे दिसून आले.
सार्वजनिक सुरक्षितता या विभागांतर्गत दिवाबत्ती-विद्युत खर्च, वायरलेस खर्च, दूरध्वनी खर्च, अग्निशामक खर्च या चार उपघटकांवर खर्च केलेला आढळून येते. दिवाबत्ती विद्युत खर्च हा एकूण सार्वजनिक सुरक्षितता खर्चाच्या ९४.३३% आले.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक सुरक्षितता विभागातील सर्वांत कमी खर्च हा वायरलेस विभागावर केलेला असून, तो रु. ३९१.१२ लाख म्हणजे ०.९९% इतका असल्याचे निदर्शनास आले.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व सोयी विभागातील ११ घटकांवर एकूण रु.१६००९७.३३ लाख इतका खर्च केलेला असून, त्या खर्चाची वार्षिक सरासरी रु.१४५५४.३० लाख इतकी आहे.
१९९७-९८ ते २००७-०८ या काळामध्ये सार्वजनिक आरोग्य व सोयी विभागामध्ये २ वर्षांचा अपवाद वगळता इतर सर्व वर्षी अगोदर वर्षीच्या खर्च तुलनेमध्ये खर्चामध्ये वाढ झाली आहे.
सार्वजनिक आरोग्य व सोयी सुविधा खर्चामध्ये ११.६०% या वार्षिक सरासरी दराने वाढ झाल्याचे आढळून आले.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर धोरणाविषयी करदात्यांच्या पाहणीतील निष्कर्ष :
करदात्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाची माहिती घेतली असता नियमित उत्पन्न मिळणाऱ्या करदात्यांची संख्या २०२ (८०.८०%), तर अनियमित उत्पन्न मिळणाऱ्या करदात्यांची संख्या ४८ (१९.२०%) असल्याचे निदर्शनास आले.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका करीत असलेली करआकारणी उचित असल्याचे मत १७५ (७०%) करदात्यांनी नोंदविले असून, ७५ (३०%) करदात्यांचे मत हे करआकारणी उचित नसल्याचे आहे.
संपत्ती कर (घरपट्टी) कर कमी करण्यात यावा असे एकूण २३८ (९५.२०%) करदात्यांचे मत असून, १२ (४.८०%) करदात्यांचे मत हे प्रतिकूल असल्याचे लक्षात आले.
पाणीपट्टी वाढ योग्य असल्याचे मत ६१ (२४.४०%), तर अयोग्य असल्याचे मत १८९ (७५.६०%) करदात्यांचे आढळून आले.
घरपट्टी व पाणीपट्टीची मात्रा कमी केल्यानंतर महानगरपालिका सराफाकडील कर वसुली, जाहिरात बोर्डावरील कराचे प्रमाण वाढवून करांचे प्रमाण वाढवू शकते, असे मत नोंदविल्याचे आढळून आले.
संपत्ती कर/घरपट्टी रूपाने जमा झालेल्या रकमेचा योग्य वापर होतो, असे मत नोंदविणाऱ्या करदात्यांची संख्या ५१ (२०.४०%), तर वापर अयोग्य होत आहे, असे मत नोंदविणाऱ्या करदात्यांची संख्या १९९ (७९.६०%) आहे.

कर रूपाने रकमेचा योग्य विनियोग होण्यासाठी प्रामुख्याने कार्यालय/मुख्यालय सुशोभीकरणावरील खर्च कमी करावा, वाढीव खर्चाचे प्रस्ताव सामूहिक चर्चेतून मंजूर करावेत, असे मत नोंदविणाऱ्या करदात्यांची संख्या ५० टक्क्यांहून अधिक असल्याचे निदर्शनास आले.
विवेकपूर्ण कर आकारणी केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल, असे मत नोंदविणाऱ्या करदात्यांची संख्या १४६ असल्याचे दिसून आले.
करप्रणाली अज्ञानामुळे प्रचलित करप्रणाली सदोष असल्याच्या मताशी पूर्णत: सहमती असल्याचे १३२ करदात्यांचे मत असल्याचे आढळून आले.

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका करधोरणाविषयी नगरसेवकांच्या पाहणीतील निष्कर्ष :**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नगरसेवकांच्या आर्थिक व सांपत्तिक पार्श्वभूमीचा अभ्यास
केला असता, जवळजवळ ८०% नगरसेवकांकडे स्वत:चे घर, स्वत:चे वाहन, शेती, स्वत:चा व्यवसाय असल्याचे आढळून आले.
पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील अभ्यास केलेल्या ५० नगरसेवकांपैकी ३१ (६२%) नगरसेवकांना प्रशासनाचे करविषयक धोरण कालसंगत वाटते.
कररोपणामुळे महानगरपालिकेला नियमित स्वरूपाचे उत्पन्न प्राप्त होते, असे मत नोंदविणाऱ्या नगरसेवकांची संख्या ४३(८६%) आहे.
सद्य:स्थितीतील पाणीपट्टी वाढ योग्य वाटणाऱ्या नगरसेवकांची संख्या २३ (४६%) असल्याचे आढळून आले.
कर हाच महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मार्ग असावा, असे मत नोंदविणाऱ्या नगरसेवकांची संख्या ३४ (६८%) आहे.
श्रीमंत व सधन व्यक्तींकडून जादा कर घेणे योग्य आहे असे मत नोंदविणाऱ्या नगरसेवकांची संख्या १४ (२८%) असल्याचे दिसून आले.
सर्व प्रकारच्या मालमत्तेवर एकाच पद्धतीने कररोपण करावे, असे मत १२(२४%) नगरसेवकांनी नोंदविले आहे.
ज्या शीर्षातून कर प्राप्त होतो, त्याच शीर्षाच्या विकासाकरिता निधी वापरणे आवश्यक असल्याचे मत २४ (४८%) नगरसेवकांनी नोंदविल्याचे दिसून आले.
महानगरपालिकेने नागरी सुविधांबाबत दायित्व कमी करावे, असे ६ (१२%) नगरसेवकांचे मत असल्याचे दिसते.
नागरिकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता उत्पन्नाच्या स्रोतांमध्ये विविधता आणणे आवश्यक आहे, असे मत ५० (१००%) आहे.
शहरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे महानगरपालिकेची परंपरागत प्रशासन पद्धती कोसळून पडत असल्याचे मत ३६ (७२%) नगरसेवकांनी नोंदविले आहे.

**काही महत्त्वाच्या शिफारशी :**

अभ्यासाच्या (१९९७-९८ ते २००७-०८) या कालखंडामध्ये उत्पन्न बाबींचा अभ्यास करताना, असा निष्कर्ष निघतो की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस सर्वाधिक उत्पन्न हे (८१.८३%) करांपासून मिळते. त्यामुळे महानगरपालिकेस आर्थिक स्वायतत्ता व स्थिरता प्राप्त होण्यासाठी प्रभावीपणे कर महसूल जमा करणे अत्यंत गरजेचे आहे.
१९९७-९८ ते २००७-०८ या काळामध्ये एकूण उत्पन्नामध्ये जकात कराचे सरासरी प्रमाण सर्वाधिक (७२.६२%) आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक बाजूच्या विचाराने जकात कर रद्द करणे हे अयोग्य आहे.
शिक्षण हे विकासासाठी पायाभूत आहे. तरीसुद्धा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने अभ्यासाच्या कालावधीत (१९९७-९८ ते २००७-०८) शिक्षण विभागावर केलेला खर्च कमी आहे. त्यामुळे शिक्षणावरील खर्चात वाढ करावी. उदा. शिक्षकांसाठी शिक्षक प्रशिक्षण केंद्र, महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, तसेच शासकीय नोकरदारांसाठी शासकीय नोकरी प्रशिक्षण केंद्र इ. ची स्थापना करावी.
वाढीव खर्चाचे प्रस्ताव सामूहिक चर्चा करूनच मंजूर करण्यात यावेत.
वित्तीय आकडेवारीला वास्तवाची जोड द्यावी. अंदाजपत्रकातील भाषा ही केवळ आकड्यांची असते. त्यांना कार्य तपशील आणि कार्य वेळापत्रक जोडल्यास जमा आणि खर्चाला वास्तवता प्राप्त होईल. ते जनसामान्यांना समजेल. प्रशासनाच्या कामाचा दर्जा सुस्पष्ट होईल.
करव्यवस्था सोपी, सुटसुटीत करून कर गोळा करण्याच्या प्रक्रियेत सहजता व पारदर्शकता आणणे आवश्यक आहे.